ePaper

**मराठा शासन निर्णयावर दोन ओबीसी मंत्र्यांचीच भिन्न भूमिका...**

| वर्ष - 9 । अंक -20 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

पुढच्या वर्षी लवकर या...!

## आतील पानांत


- अफगाणिस्तानची विजयी सलामी!
- डेवाल्ड ब्रेविससाठी रेकॉर्डब्रेक बोली!
- महाराष्ट्राचे राज्यपाल देशाचे नवे उपराष्ट्रपती
- नेपाळच्या अर्थमंत्र्यांवर हल्ला


www.mahaenews.com । बुधवार, दि. 10 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**संसद पेटवली** PM मोदींनी बोलावली तातडीची बैठक

# नेपाळमध्ये लष्करी राजवट जाहीर!

## भ्रष्टाचार आणि सोशल मीडियावरील बंदीविरोधात जनतेचा संताप, हिंसक आंदोलनाला ऊत





। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**नेपाळमधील जनता वाढता भ्रष्टाचार आणि सोशल मीडियावरील बंदीमुळे रस्त्यावर उतरली आहे. या आंदोलनाला हिंसक वळण लागलं आहे. काही आंदोलकांनी संसद भवन पेटवले आहे. तसेच अनेक मंत्र्यांची घरे जाळली आहेत. जनतेच्या रागामुळे केपी ओली शर्मा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर नेपाळमधील जनता वाढता भ्रष्टाचार आणि सोशल मीडियावरील बंदीमुळे रस्त्यावर उतरली आहेपंतप्रधान नरेंद्र मोदींनी एक तातडीची बैठकही बोलावली होती. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.**

### नेपाळची सत्ता लष्कराच्या हातात

देशात आज दिवसभर जाळपोळ सुरु आहे. अशाचत आज नेपाळचे लष्करप्रमुख अशोक राज सिग्देल यांनी जनतेशी संवाद साधला. सिग्देल म्हणाले की, ‘कठीण परिस्थितीत नेपाळचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता, स्वातंत्र्य, राष्ट्रीय एकता आणि नेपाळी लोकांच्या सुरक्षेसाठी लष्कर वचनबद्ध आहे. नेपाळमध्ये सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान झालेल्या जीवित आणि मालमत्तेच्या नुकसानाबद्दल आम्ही तीव्र दुःख व्यक्त करतो.’ पुढे बोलताना त्यांनी रात्री 10 वाजल्यापासून देशात लष्करी राजवट लागू करत असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आता नेपाळची सत्ता लष्कराच्या हातात गेली आहे.



### पंतप्रधान मोदींनी बोलावली बैठक

नेपाळमधील परिस्थितीवर भारताचीही बारीक नजर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत लिहिले की, ‘आज, हिमाचल प्रदेश आणि पंजाब दौऱ्यावरून परतल्यानंतर, मंत्रिमंडळ सुरक्षा समितीच्या बैठकीत नेपाळमधील घडामोडींवर सविस्तर चर्चा झाली. नेपाळमधील हिंसाचार हृदयद्रावक आहे. अनेक तरुणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, यामुळे खूप वेदना होत आहेत. नेपाळची स्थिरता, शांतता आणि समृद्धी आमच्या खूप महत्त्वाची आहे. मी नेपाळमधील माझ्या सर्व बंधू आणि भगिनींना शांतता राखण्याचे नम्र आवाहन करतो.’

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महत्वाची बैठक बोलवत नेपाळमधील शांततेवर भाष्य केलं आहे. त्यामुळे भारत सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत तर नाही ना? असा प्रश्न उपस्थित होत आहे. आता येत्या काही दिवसांमध्ये नेपाळमध्ये शांतता परतेल अशी आशा पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली आहे.

‘या’ आवाहनानंतर खळबळ उडाली नेपाळचे माजी राजे ज्ञानेंद्र शहा यांनी 19 फेब्रुवारी रोजी लोकशाही दिनानिमित्त एक व्हिडिओ संदेश जारी करून जनतेचा पाठिंबा मागितला होता. तेव्हापासून नेपाळमध्ये राजेशाही पुन्हा प्रस्थापित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. राष्ट्रीय प्रजातंत्र पार्टी (राष्ट्रीय प्रजातंत्र पक्ष) आणि इतर राजेशाही समर्थक गटही या मागणीसाठी सक्रिय झाले आहेत.

## काय म्हणाले राजेशाही समर्थक?

नेपाळमध्ये बऱ्याच काळापासून राजकीय अस्थिरता आहे. वाढती महागाई, भ्रष्टाचार आणि राजकीय अस्थिरतेमुळे जनतेचा मोठा वर्ग सरकारवर असमाधानी आहे. नेपाळमध्ये लोकशाही आल्यानंतर देशाची परिस्थिती बिकट झाली आहे, त्यामुळे आता जुनी राजेशाही राजवट पुन्हा प्रस्थापित करण्याची गरज असल्याचे राजेशाही समर्थकांचे म्हणणे आहे. तर दुसरीकडे रिपब्लिकन समर्थक हे लोकशाहीविरोधी षडयंत्र असल्याचे सांगत भ्रष्टाचाराविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी करत आहेत.

### नेपाळमध्ये पुढे काय?

नेपाळमध्ये गेल्या काही काळापासून सरकार आणि विरोधक यांच्यातील राजकीय संघर्ष तीव्र झाला आहे. अशा परिस्थितीत राजेशाही समर्थक आणि रिपब्लिकन यांच्यातील वाढता संघर्ष देशात आणखी अस्थिरता आणू शकतो. सध्या सरकारने या मुद्द्यावर कठोर भूमिका घेण्याचे संकेत दिले असून हिंसाचार पसरवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे आगामी काळात नेपाळचे राजकारण कोणत्या दिशेने जाणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

सरकारी खोडा

महापालिका राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविणार

# क्षेत्रीय कार्यालयांच्या संख्येत लवकरच वाढ!

## गावांमुळे प्रभागांचे क्षेत्रफळ वाढले

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रभागातील प्रश्न संबंधित क्षेत्रीय कार्यालयांच्या पातळीवर सोडविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकारात वाढ करण्याचा; तसेच महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमुळे प्रभागांचे क्षेत्रफळ वाढले असल्याने क्षेत्रीय कार्यालयांच्या संख्येत वाढ करण्याचा विचार महापालिकेने सुरू केला आहे. याबाबतचा प्रस्ताव तयार करून राज्य सरकारच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.**



महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मंगळवारी १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या सहायक आयुक्तांची तसेच विविध विभागांच्या प्रमुखांची बैठक घेतली. क्षेत्रीय कार्यालयांच्या सक्षमीकरणासाठी काय केले पाहिजे, यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आलेल्या अधिकारांमध्ये वाढ करण्याबरोबर क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये मोठी वाढ करण्याबाबत या बैठकीत चर्चा झाली.अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज म्हणाले, महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमुळे महापालिकेची हद्द वाढली आहे. प्रभागांचे क्षेत्रफळ वाढले आहे. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयाकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ कमी पडते. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांचे सक्षमीकरण करताना आवश्यक मनुष्यबळ देखील उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. महापालिकेचे क्षेत्रफळ वाढल्याने सध्या अस्तित्वात असलेली क्षेत्रीय कार्यालये कमी पडत आहेत. त्यामुळे नवीन क्षेत्रीय कार्यालये तयार करता येतील का? याची चाचपणी बैठकीत करण्यात आली.राज्य सरकारने क्षेत्रीय कार्यालयांची संख्या वाढविण्यासाठी मान्यता दिल्यास कर्मचारी संख्याही वाढणार आहे. नागरिकांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाच्या संख्येत वाढ करावी लागणार आहे. ही संख्या वाढल्यास आपोआप मनुष्यबळ वाढविण्यासाठी नोकर भरती करावी लागणार आहे. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांच्या संख्येत वाढ करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून राज्य सरकारला पाठविण्याबाबत बैठकीत चर्चा झाल्याचे पृथ्वीराज यांनी सांगितले.महापालिकेत गेल्या तीनपेक्षा अधिक वर्षांपासून नगरसेवक नाहीत. संपूर्ण कारभार हा प्रशासनाच्या हाती आहे. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. या तक्रारी क्षेत्रीय कार्यालयाच्या पातळीवर सोडविण्यात येत नसल्याने नागरिक तक्रारी घेऊन महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये असलेल्या विभागांकडे येतात. त्यामुळे महापालिकेत गर्दी होत असल्याचे चित्र दिसते. क्षेत्रीय कार्यालयांच्या सहायक आयुक्तांना असलेले मर्यादित अधिकारी आणि कमी असलेला निधी यामुळे समस्या सुटत नसल्याची माहिती समोर आली होती. यावर तोडगा काढण्यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मंगळवारी बैठक घेत सर्व अधिकाऱ्यांशी संवाद साधून चर्चा केली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मंगळवारी १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या सहायक आयुक्तांची तसेच विविध विभागांच्या प्रमुखांची बैठक घेतली. क्षेत्रीय कार्यालयांच्या सक्षमीकरणासाठी काय केले पाहिजे, यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आलेल्या अधिकारांमध्ये वाढ करण्याबरोबर क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये मोठी वाढ करण्याबाबत या बैठकीत चर्चा झाली.अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज म्हणाले, महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमुळे महापालिकेची हद्द वाढली आहे. प्रभागांचे क्षेत्रफळ वाढले आहे. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयाकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ कमी पडते. महापालिकेचे क्षेत्रफळ वाढल्याने सध्या अस्तित्वात असलेली क्षेत्रीय कार्यालये कमी पडत आहेत. त्यामुळे नवीन क्षेत्रीय कार्यालये तयार करता येतील का? याची चाचपणी बैठकीत करण्यात आली.

### तातडीची कामे करण्यासाठी प्रतीक्षा

मान्यता दिल्यास कर्मचारी संख्याही वाढणार आहे. नागरिकांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाच्या संख्येत वाढ करावी लागणार आहे. ही संख्या वाढल्यास आपोआप मनुष्यबळ वाढविण्यासाठी नोकर भरती करावी लागणार आहे. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांच्या संख्येत वाढ करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून राज्य सरकारला पाठविण्याबाबत बैठकीत चर्चा झाल्याचे पृथ्वीराज यांनी सांगितले.

# म्हाडा पुनर्विकास प्रकल्पांना आता गती

## उपमुख्यमंत्री यांच्याकडून आढावा; दापोडीतील लाभार्थ्यांचा थेट योजनेत समावेश

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील (म्हाडा) रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती मिळणार आहे. सुसज्ज रस्ते आणि सोयी सुविधांयुक्त मापके निश्चित करून एकल किंवा समूह पुनर्विकासाला गती देण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी स्थानिक नियोजन प्राधिकरणांना आदेश दिले आहेत. त्यामुळे पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या स्थानिकांना दिलासा मिळणार आहे.**




उपमुख्यमंत्री पवार यांनी मुंबई मंत्रालयात राज्यातील म्हाडाच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी नेरे, रोहकल आणि शिरूर तालुक्यातील म्हाडाच्या प्रकल्पांबाबत विशेष बैठक घेतली. प्रधानमंत्री आवास योजना २.० ची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून द्यावीत, असे निर्देशही त्यांनी दिले.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजी आढळराव पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नगरविकास व गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे, पुणे म्हाडा विभागाचे मुख्याधिकारी राहुल साकोरे उपस्थित होते.मुळशी तालुक्यातील नेरे, खेड तालुक्यात रोहकल येथे प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीत आणि शिरूर तालुक्यातील म्हाडाच्या जागेवर नव्याने उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पातही अडचणी येत आहेत.

### पवार यांनी सूचना केल्या

याबाबत जिल्हाधिकारी डुडी यांनी संबंधितांसोबत बैठक घेऊन काम मार्गी लावावे. तसेच खराडीतील म्हाडा अभिन्यासातील टपाल कार्यालयाचे आरक्षण रद्द करण्याबाबतचे निर्देश पवार यांनी दिले. लोणावळा नगरपरिषद हद्दीत म्हाडाच्या मालकीच्या जागांवर पुनर्विकास आणि नवीन बांधकामांबाबत तातडीने अहवाल तयार करण्याबाबत पवार यांनी सूचना केल्या.

## १४ दिवसांत एकूण ३१८ हरकती | महापालिकेच्या प्रारूप प्रभागरचना

# हरकतींवर आज सुनावणी!

## चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात हरकतींवर सुनावणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**




पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी: पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभागरचनेवर आलेल्या ३१८ हरकतींवर सुनावणी घेण्यात येणार आहे. चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात बुधवारी (१० रोजी) एकाच दिवशी सुनावणी घेतली जाणार आहे. राज्याचे सहकार आणि विपणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे या हरकतींवर सुनावणी घेणार आहेत.

महापालिकेने २२ ऑगस्टला चार सदस्यीय पद्धतीने ३२ प्रभागांची प्रारूप रचना जाहीर केली. प्रारूप प्रभागरचनेचे नकाशे प्रसिद्ध केले आहेत. या प्रभागरचनेवर १४ दिवसांत एकूण ३१८ हरकती आल्या आहेत. यामध्ये मोरवाडी, शाहूनगर, संभाजीनगर या प्रभागाच्या रचनेवर सर्वाधिक ११५, प्रभाग क्रमांक १ चिखली गावठाण, मोरेवस्ती या प्रभागाबाबत ९८ आणि महेशनगर, संत तुकारामनगर व वल्लभनगर प्रभागाबाबत ३१ हरकती आल्या आहेत. प्रभाग क्रमांक ५, १३, १५, १६, १७, १८, २५, २७ आणि २८ या प्रभागांच्या रचनेबाबत एकही हरकत आली नाही. हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी सहकार आणि विपणन विभागाचे प्रधान प्रवीण दराडे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्यासमोर बुधवारी दुपारी एक ते चार या वेळेत ३१८ हरकती आणि सूचनांवर सुनावणी घेतली जाणार आहे. प्रभाग क्रमांक १, २, ११, १२मधील हरकतींवर दुपारी एक वाजता, प्रभाग क्रमांक ३, ४, ६, ७, ८, ९, २०, ३० मधील हरकतींवर दोन वाजता, प्रभाग क्रमांक १०, ११ मधील हरकतींवर तीन वाजता आणि प्रभाग क्रमांक १४, १९, २१, २२, २३, २४, २६, २९, ३१, ३२मधील हरकतींवर दुपारी चार वाजता सुनावणी होणार आहे. हरकत घेणाऱ्या नागरिकाला हरकत दाखल केल्याची पोहोच, सुनावणी नोटीसची प्रत, ओळखपत्रासह प्रत्यक्ष सुनावणीसाठी उपस्थित राहावे लागणार आहे. त्यासाठी सूचनापत्र पाठविले आहे. किती हरकती स्वीकारायच्या, स्वीकारायच्या की नाहीत, प्रारूप रचनेत बदल करायचा की नाही, याचा अहवाल प्राधिकृत अधिकारी दराडे देतील. त्यानंतर अंतिम प्रभागरचनेचा आराखडा तयार करून राज्य शासनाला पाठविला जाणार आहे. त्यानंतर तीन ते सहा ऑक्टोबर दरम्यान अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती महापालिका निवडणूक विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिली.

# उत्सवकाळात मेट्रोला अधिक पसंती!

## पिंपरी चिंचवड परिसरातील स्थानकावरून 6 लाख 91 हजार 583 प्रवाशांचा प्रवास

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गणेशोत्सवात प्रवाशांनी वाहतूक कोंडीतून तसेच धक्के खात प्रवास करण्यापेक्षा मेट्रोतून निवांत काही काही मिनिटात इच्छितस्थळी पोहोचविणारा प्रवास केला. परिणामी मेट्रोच्या तिजोरीत मोठी भर पडली. उत्सवकाळात मेट्रो प्रवासाला प्रवाशांचा अधिक पसंती मिळत असल्याचे दिसत आहे.**



गणेशोत्सवाच्या काळात पुणे मेट्रोने विक्रमी प्रवासी आणि उत्पन्नाची नोंद केली आहे. पिंपरी-चिंचवड परिसरातील स्थानकांवरून ६ लाख ९१ हजार ५८३ प्रवाशांनी प्रवास केला, तर १ कोटी ३४ लाख ९२ हजार ३२ रुपयांचे उत्पन्न मिळाले. यंदा उत्सवाच्या गर्दीत मेट्रोने पुण्याच्या मध्यवर्ती भागात जाणे-येणे अतिशय सोपे केले, ज्यामुळे प्रवाशांची संख्या गेल्यावर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढली. मेट्रो प्रशासनामुळे रात्रभर सेवा उपलब्ध झाली, ज्याचा फायदा लाखो भाविकांना झाला.

यंदाच्या गणेशोत्सवात २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या काळात पुणे मेट्रोने एकूण ३७.१६ लाख प्रवाशांना सेवा दिली आणि ५.६७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले, मेट्रोच्या विस्तारित सेवा आणि उत्सव काळातील विशेष नियोजन या वाढीचे मुख्य कारण आहे.

पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट आणि वनाज ते रामवाडी या मार्गावर मेट्रोने भाविकांना वाहतूक कोंडीच्या त्रासापासून मुक्ती दिली. यंदा ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या काळात मेट्रो रात्री दोनपर्यंत धावली, तर अनंत चतुर्दशीला ४१ तास सलग सेवा पुरवली गेली. यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना रात्री उशिरा घरी पोहोचणे शक्य झाले.

मेट्रोला मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रवासी संख्येत ३०० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली, ज्यामुळे उत्पन्नातही मोठी भर पडली. मेट्रो प्रशासनाने गर्दी हाताळण्यासाठी अतिरिक्त फेऱ्या, सुरक्षा व्यवस्था आणि स्टेशनवर सुविधा वाढवल्या.

रात्रीच्या वेळी प्रवाशांना घरी पोहोचण्यासाठी मेट्रोने पीएमपी बससेवा आणि ऑटोरिक्षा थांब्यांशी

### मेट्रोस्थानकांवर प्रवाशांची अलोट गर्दी

गणेशोत्सव काळात पिंपरी येथील मेट्रोस्थानकावरून 3 लाख 81 हजार प्रवाशांनी प्रवास केला. या प्रवाशांकडून मेट्रोला 77 लाख 42 हजार रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले. संत तुकाराम नगर स्थानकावरून 88 हजार प्रवाशांनी केलेल्या प्रवासातून 17 लाख 14 हजार, भोसरी नाशिक फाटा स्थानकावरून 1 लाख 17 हजार प्रवाशांनी प्रवास केला. यातून 22 लाख 49 हजार, कासरवाडी येथील स्थानकावरून 28 हजार प्रवाशांनी प्रवास केला. यातून 4 लाख 96 हजार, फुगेवाडी स्थानकावरून 10 हजार प्रवाशांनी प्रवास केला यातून 1 लाख 81 हजार तर दापोडी येथील स्थानकावरून 65 हजार प्रवाशांनी प्रवास केला असून यातून 11 लाख रुपयांचे उत्पन्न मेट्रोला प्राप्त झाले आहे.



भूमिका

**महाराष्ट्रात १०८ रुग्णवाहिका ही सेवा सध्या सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलद्वारे चालवली जाते. 'गोल्डन अवर' म्हणजे पहिल्या एका तासात कोणत्याही रुग्णाला जवळच्या रुग्णालयात पोहोचवून, त्यांना तातडीची वैद्याकीय मदत मिळवून देणे हा या सेवेचा उद्देश आहे. २०१४ ते २०१९या कालावधीत, ९३७ रुग्णवाहिका चालवण्याचा करार बीव्हीजी इंडिया कंपनीशी वार्षिक ३०० कोटी रुपयांच्या बोलीवर केला गेला.**

# रुग्णवाहिका सेवेत कंत्राटी पद्धत अयोग्यच!



हा करार २०२४ पर्यंत वाढवत नेण्यात आला. गेल्या वर्षी एक नवीन निविदा काढण्यात आली आणि २०२५ मध्ये संयुक्तपणे बीव्हीजी इंडिया, सुमित फॅसिलिटी आणि एसएसजी ट्रान्सपोर्ट सॅनिटेरिआला या सेवेचा ठेका दिला गेला आणि त्यानंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले. वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या बातम्यांनुसार पुढील दहा वर्षांसाठी १०८ रुग्णवाहिका सेवेकरिता १० हजार कोटींपेक्षा अधिकचा खर्च राज्य शासन करणार आहे. या करारावर अनेक आक्षेप घेतले गेले आहेत आणि यामध्ये राजकीय हस्तक्षेप होऊन शेकडो कोटी रुपयांचे गैरव्यवहार झाल्याचे आरोप सामाजिक कार्यकर्ते आणि विरोधी पक्षांनी केले आहेत. काही प्रश्नांची उत्तरे मिळणे गरजेचे आहे. नव्या करारानुसार खरेदी करण्यात येणाऱ्या रुग्णवाहिका आणि उपकरणांचा खर्च सुमारे ५८० कोटी रुपये आहे. ऑपरेशन आणि देखभालीचा खर्च पहिल्या वर्षी ७०० कोटी रुपये असेल, आणि त्यात दरवर्षी आठ टक्के वाढ होईल. एक हजार ७५६ रुग्णवाहिका चालवण्यासाठी एकूण खर्च १० हजार कोटींपेक्षा जास्त असणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रात एका रुग्णवाहिकेचा प्रति महिना खर्च साडेतीन लाख रुपये असेल. आंध्र प्रदेशात २०२४ मध्ये संपलेल्या करारानुसार, २०२३-२४ दरम्यान प्रति रुग्णवाहिकेचा मासिक खर्च दोन लाख पाच हजार ते दोन लाख तेरा हजार रुपये होता. कर्नाटक सरकारने २०२५ मध्ये तेथील १०८ रुग्णवाहिका सेवेचा करार संपुष्टात आणला आणि स्वत:च सेवा देण्याचा निर्णय घेतला. तिथे प्रति रुग्णवाहिका सरासरी दोन लाख १० हजार रुपये खर्च होतात. म्हणजे महाराष्ट्रातील प्रति रुग्णवाहिका मासिक खर्च या राज्याच्या तुलनेत दीडपट जास्त आहे.

नव्या एमईएमएस कराराच्या टेंडर प्रक्रियेतही गंभीर अनियमितता झाल्याचे आरोप होत आहेत आणि राजकीय हस्तक्षेपाची शंका व्यक्त केली जात आहे. एका सायबर फॉरेन्सिक अहवालातून असे समोर आले आहे की, महत्त्वाच्या निविदा कागदपत्रांचा मसुदा सरकारी अधिकाऱ्यांनी नव्हे, तर कंत्राटदार 'सुमित फॅसिलिटीज'च्या पिंपरी कार्यालयात तयार करण्यात आला. निविदा विशिष्ट ठेकेदारास फायदा मिळवून देण्याच्या उद्देशाने तयार केली गेली का, अशी शंका उपस्थित करण्यात आली आहे. सुरुवातीला ३० हून अधिक कंपन्यांनी स्वारस्य दाखवले होते, परंतु, अतिरिक्त कठोर अटींमुळे इतर कंपन्या निकष पूर्ण करू शकल्या नाही.

'सुमित फॅसिलिटीज' ही एक सरकारी सल्लागार संस्थादेखील आहे आणि त्यामुळे कायदेशीररीत्या निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास प्रतिबंधित आहे. असे असूनही, कंपनीला ठेका देण्यात आला, हे हितसंबंधांच्या नियमांचे स्पष्ट उल्लंघन आहे. १३ मार्च २०२४ रोजी कॅबिनेट बैठकीत निविदेला मंजुरी मिळाल्याचा दावा करण्यात आला होता, पण प्रत्यक्षात हा प्रस्ताव त्या दिवशीच्या कॅबिनेटच्या मंजुरी यादीत नव्हता. तरीही, १५ मार्च २०२४ रोजी कार्यादेश जारी करण्यात आला. शिवाय, हा करार झाल्यानंतर महिन्याने, एप्रिल २०२४ मध्येच या कंत्राटदारांच्या गटाची नोंदणी झाली. सुमित फॅसिलिटीजच्या अमित साळुंखे नावाच्या भागीदारांना झारखंडमधील दारू घोटाळ्यात सामील असल्यामुळे नुकतीच अटक झाली. तसेच, कंपनीवर छत्तीसगडमध्येही एका घोटाळ्याचा आरोप आहे, याच वादग्रस्त कंपनीला महाराष्ट्रात काम मिळाले. तसेच उच्च न्यायालयाने बीव्हीजी इंडिया लिमिटेडला न्यायालयीन ऑडिट करण्याचे आदेश दिले होते. राज्य सरकारने न्यायालयाला आश्वासन दिले होते की, ऑडिटचे निकाल उपलब्ध होईपर्यंत कंपनीला भविष्यातील निविदांत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. मात्र, या अपेक्षित न्यायालयीन ऑडिटची कधीही अंमलबजावणी झाली नाही. ज्या सेवेसाठी राज्य सरकार इतका प्रचंड खर्च करते, त्या सेवेचा दर्जा निकृष्ट असल्याचे वारंवार दिसून आले आहे. 'गोल्डन अवर'मध्ये रुग्ण रुग्णालयात पोहोचणे दुर्मीळ बाब झाली आहे.

## संपादकीय »

# 'ओली'गोपोली!

***बांगलादेश असो वा नेपाळ... या दोन्ही ठिकाणच्या परिस्थितीचा अंदाज बांधण्यास आपली यंत्रणा कमी पडली हे नाकारण्यात अर्थ नाही...***

आपल्या पूर्वेकडील बांगलादेशाप्रमाणे उत्तरेकडील शेजारी नेपाळ हा एक खड्डयात गेलेला देश आहे. तथापि हा खड्डा किती खोल आहे त्याचे दर्शन गेल्या दोन दिवसांतील आंदोलनांमुळे झाले. पंतप्रधान के. पी. ओली यांनाच या विवराने ओढून घेतले. पण म्हणून नेपाळ शांत होईल याची हमी नाही. नेपाळमध्ये जे काही सुरू आहे त्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी हे सत्य लक्षात घ्यावे असे. म्हणजे प्रदेश लहान असेल तर त्यातील प्रगतीच्या संधींचा अभाव, एकमेकांची हलाखी, दारिद्र्य एकमेकांपासून लपून राहात नाही. त्याच वेळी; सत्ताधीश जर त्याकडे दुर्लक्ष करा असे म्हणत असतील किंवा हे दरिद्री वास्तव दडवून ठेवण्याचा प्रयत्न करत असतील तर त्याविरुद्धचा उद्रेक अशा प्रदेशात लवकर उफाळून येतो. नेपाळ हे त्याचे ज्वलंत उदाहरण. हिमालयाचा आडोसा नसता आणि काही महत्त्वाची तीर्थस्थळे नसती.

**एक मराठा लाख मराठा' या घोषणेभोवती जमणारी गर्दी गेले काही वर्षे वाढत गेली. गर्दी जमण्याचे इंजिन आणि त्याचे सुटे भाग कसे आणि कोठे तयार झाले, त्याची पार्श्वभूमी मराठवाड्याच्या भूमीतच का निर्माण झाली या प्रश्नांची उत्तरे शोधताना अनेक घटनांची श्रृंखला समोर ठेवावी लागेल.**

# मागासपणा वाढतो की जातीयवाद?

२००४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी जेम्स लेन प्रकरण तापले होते. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेतील काहीजणांनी छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणारी माहिती जेम्स लेन यास पुरवली. तेव्हा ही संस्थाच चुकीचा इतिहास पसरवत आहे, अशी तीव्र भावना मराठा समाजात निर्माण झाली. त्यातून कळंब तालुक्यातील अनंत चोंदे या तरुणाने ७२ जणांचा एक चमू तयार केला आणि पुण्यातील भांडारकर संस्थेवर हल्ला केला. पुढे अनंत चोंदे संभाजी ब्रिगेडचे प्रमुख असताना इतिहासाच्या पुस्तकातील मजकुरावर आक्षेप घेण्यात आले. दादोजी कोंडदेव यांचा पुण्यातील पुतळा तसेच राम गणेश गडकरी पुतळा हटविण्यापर्यंतची अनेक आंदोलने झाली. तेव्हा आंदोलनाचे दोन केंद्र होते. मराठवाड्यातील तरुण आणि पुणे शहरातील प्रतिके. तत्पूर्वी मूळचे लातूर येथील अण्णासाहेब जावळे यांच्या कार्यकर्त्यांनी लालकृष्ण अडवणी यांच्या




गाडीसमोर स्वत: झोकून देत रस्ता रोको केला. त्यानंतर वादग्रस्त जेन्स लेन पुस्तकाचा संदर्भ देशभर चर्चेत आला. पुढे त्या पुस्तकावर बंदी आली. या काळात देण्यात आलेला संदेश होता की, उच्चवर्णीय आणि विशेषत: ब्राम्हण इतिहासाची मोडतोड करतात, छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या लाखोंच्या प्रेरणास्रोताचा अवमान करताना ते मागेपुढे पाहत नाहीत, ही भावना मराठा समाजात दाटून राहिलेली. याच काळात संभाजी ब्रिगेड आणि मराठा सेवा संघाने शिवधर्माची चर्चा सुरू केली. या घटना घडामोडीच्या काळात गृहमंत्रीपदी आर. आर. पाटील होते. यांच्या समोर प्राच्य विद्या संस्थेवर हल्ला करणारे तरुणांवरील गुन्हे मागे घ्यावेत अशा घोषणा आवर्जून दिल्या जात होत्या. अर्थात हे गुन्हे काही माघारी घेतले गेले नाहीत. त्यातील अनेक तरुणांना न्यायालयीन लढे लढण्यासाठी खूप कष्ट करावे लागले. त्यांच्यासमोर शेतीशिवाय पर्याय राहिले नाहीत. या कालखंडात जातीयवाद वाढविण्यात शरद पवार यांचा मोठा हात होता, असा आरोप राज ठाकरे यांनी अगदी अलिकडेच केला होता. एका बाजूला मराठा समाजातील अंतर्प्रवाह आणि विचार बदलले जात असताना ब्राम्हण समाजातील काहींनी परभणी, बीड येथे अधिवेशने घेतली. या काळात अचानकच परशुराम जयंती मोठी केली जाऊ लागली. हातात परशु घेतलेल्या ऋषींचे भ्रमणध्वनीवर स्टेटस ठेवले जाऊ लागले. विरोधी विचार करणाऱ्या संपादक आणि वर्तमानपत्रातील व्यक्तीशी झोंबाझोंबी करण्यापर्यंत ब्राम्हण समाजातील तरुण आक्रमक झाले. विरोधात विचार व्यक्त करणारी व्यक्ती म्हणजे शत्रू अशी भावना समाजात रुजवली जात होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

कामांसाठी ‘लॅपटॉप’

## कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय?

# कृषी कर्मचाऱ्यांना मिळणार ‘लॅपटॉप’!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या आग्रही मागणी समोर अखेर प्रशासनाला माघार घ्यावी लागली. प्रशासनाने शेवटच्या क्षणापर्यंत लॅपटॉप ऐवजी टॅब कसा उपयुक्त आहे, हे पटवून सांगण्याचा प्रयत्न केला. पण, कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी टॅब नको, लॅपटॉपच पाहिजे, अशी आग्रही भूमिका घेतली. अखेर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी हस्तक्षेप करीत लॅपटॉप देण्यावर शिक्कामोर्तब केले. सोमवारी मागणी लॅपटॉपची, सक्ती टॅबची, या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करून हा प्रकार उजेडात आणला होता.**

## लॅपटॉप ऐवजी टॅब उपयुक्त



कृषी कर्मचाऱ्यांच्या मे महिन्यातील आंदोलनानंतर राज्य सरकारने सुमारे १३ हजार कृषी कर्मचाऱ्यांना ऑनलाइन कामांसाठी ‘लॅपटॉप’ देण्याचे जाहीर केले होते. पण, प्रशासनाने ‘लॅपटॉप’ ऐवजी ‘टॅब’ देण्याचा घाट घातला होता. ‘टॅब’ घेण्याच्या सक्तीमुळे कृषी विभागाचे कर्मचारी आक्रमक झाले होते. कामांवर बहिष्कार घालण्याचा इशारा ही दिला होता. त्यामुळे मंगळवारी मंत्रालयात मंत्री भरणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला कृषी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थितीत होते.या बैठकीतही कृषी विभागाच्या प्रशासनाने सादरीकरण करून लॅपटॉप ऐवजी टॅब उपयुक्त असल्याचा दावा केला. पण, कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी लॅपटॉपसाठी आग्रह धरला. आम्ही २०१४ पासून लॅपटॉपची मागणी करीत आहोत. सर्व प्रकारच्या ऑनलाइन कामांसाठी टॅब पुरेसा नाही. त्यामुळे आम्ही टॅब स्विकारणार नाही, अशी स्पष्ट भूमिका जाहीर केली. कर्मचाऱ्यांची आग्रही मागणी घेऊन मंत्री भरणे यांनी कर्मचाऱ्यांना नाराज करू नका. गाव पातळीवर त्यांना कामे करायची आहेत, त्याची सोय पहा, त्यांची अडवणूक करू नका, असे सांगून लॅपटॉप देण्यावर शिक्कामोर्तब केले. दरम्यान, राज्यातील १०,६२० सहाय्यक कृषी अधिकारी, १,७७० उप कृषी अधिकारी आणि ८८५ मंडल कृषी अधिकारी, अशा सुमारे १३,२७५ कृषी कर्मचाऱ्यांना लॅपटॉप देणे अपेक्षित आहे. प्रति लॅपटॉप ६० हजार रुपये अंदाजित रक्कम गृहीत धरता लॅपटॉप वितरणासाठी सुमारे ७९. ६५ कोटी रुपयांची गरज आहे. गत दहा वर्षांपासून ऑनलाइन कामांसाठी कोणतीही सुविधा नसताना आम्ही ऑनलाइन कामे करीत आलो आहोत. आताही

## ७९. ६५ कोटी रुपयांची गरज

लॅपटॉप देण्यावर शिक्कामोर्तब केले.दरम्यान, राज्यातील १०,६२० सहाय्यक कृषी अधिकारी, १,७७० उप कृषी अधिकारी आणि ८८५ मंडल कृषी अधिकारी, अशा सुमारे १३,२७५ कृषी कर्मचाऱ्यांना लॅपटॉप देणे अपेक्षित आहे. प्रति लॅपटॉप ६० हजार रुपये अंदाजित रक्कम गृहीत धरता लॅपटॉप वितरणासाठी सुमारे ७९. ६५ कोटी रुपयांची गरज आहे. गत दहा वर्षांपासून ऑनलाइन कामांसाठी कोणतीही सुविधा नसताना आम्ही ऑनलाइन कामे करीत आलो आहोत.

टॅबची सक्ती घेण्याची केली जात होती. मात्र, कृषिमंत्र्यांनी लॅपटॉपचे वितरण करण्याचे आदेश दिले आहेत. आता शक्य तितक्या लवकर लॅपटॉप मिळावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य सहाय्यक कृषी अधिकारी संघटनेचे अध्यक्ष विलास रिंढे यांनी केली.कृषी कर्मचाऱ्यांच्या मे महिन्यातील आंदोलनानंतर राज्य सरकारने सुमारे १३ हजार कृषी कर्मचाऱ्यांना ऑनलाइन कामांसाठी ‘लॅपटॉप’ देण्याचे जाहीर केले होते. पण, प्रशासनाने ‘लॅपटॉप’ ऐवजी ‘टॅब’ देण्याचा घाट घातला होता. ‘टॅब’ घेण्याच्या सक्तीमुळे कृषी विभागाचे कर्मचारी आक्रमक झाले होते. कामांवर बहिष्कार घालण्याचा इशारा ही दिला होता. त्यामुळे मंगळवारी मंत्रालयात मंत्री भरणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला कृषी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थितीत होते.या बैठकीतही कृषी विभागाच्या प्रशासनाने सादरीकरण करून लॅपटॉप ऐवजी टॅब उपयुक्त असल्याचा दावा केला. पण, कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी लॅपटॉपसाठी आग्रह धरला. आम्ही २०१४ पासून लॅपटॉपची मागणी करीत आहोत. सर्व प्रकारच्या ऑनलाइन कामांसाठी टॅब पुरेसा नाही. त्यामुळे आम्ही टॅब स्विकारणार नाही, अशी स्पष्ट भूमिका जाहीर केली. कर्मचाऱ्यांची आग्रही मागणी घेऊन मंत्री भरणे यांनी कर्मचाऱ्यांना नाराज करू नका. गाव पातळीवर त्यांना कामे करायची आहेत.

# विधान परिषद विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय घ्या!

## काँग्रेस नेत्यांनी घेतली मुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्षांची भेट

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधान परिषद विरोधी पक्षनेतेपदाचा शिवसेना ठाकरे गटाचे अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर या पदासाठी काँग्रेस फारच आग्रही झाली आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, विधान परिषद सभापती राम शिंदे यांची भेट घेतल्यानंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात आणि अमिन पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही आज भेट घेतली.**





विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय तत्काळ घ्या अशी मागणी यावेळी करण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर काँग्रेस नेत्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचीही भेट घेतली. शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांची विधान परिषद सदस्यत्वाची मुदत २९ ऑगस्ट रोजी संपल्यानंतर रिक्त झालेल्या विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेसची धावपळ सुरू झाली आहे. विधान परिषदेत विरोधी बाकांवर काँग्रेसचे सर्वाधिक आठ सदस्य आहेत. त्यामुळे विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदावर दावा केला आहे. मात्र, विधानसभेप्रमाणे विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय प्रलंबित राहू नये म्हणून काँग्रेस नेत्यांनी गेल्या दोन दिवसांपासून भेटीगाठींचे सत्र आरंभले आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या भेटीदरम्यान काँग्रेसने विधानसभा आणि विधान परिषदेत रिक्त असलेल्या विरोधी पक्षनेतेपदाबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर काँग्रेस नेत्यांनी विधानभवनात जाऊन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

## प्रा. राम शिंदे यांना लवकरच पत्र

यावेळी मुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्षांनी विरोधी पक्षनेतेपदाबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेसकडून सतेज उर्फ बंटी पाटील यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे. यासंदर्भात विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना लवकरच पत्र दिले जाणार आहे.

## उपराष्ट्रपती निवडणूक : सी. पी. राधाकृष्णन यांचा बी. सुदर्शन रेड्डी यांच्यावर विजय

# महाराष्ट्राचे राज्यपाल देशाचे नवे उपराष्ट्रपती!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीसाठी आज मतदान झाले. यात एकूण ९८ टक्के मतदान झाले. यामध्ये एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन आणि इंडिया अलायन्सचे उमेदवार जस्टिस बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात थेट लढत झाली. यामध्ये एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांनी एकतर्फी विजय मिळवला.**

## पहिल्या पसंतीची ४५२ मते



यासाठी आज सकाळी १० वाजता मतदान सुरू झाले आणि सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालले. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम मतदान केले. त्यानंतर केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अर्जुन राम मेघवाल आणि किरेन रिजिजू, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, भाजपा खासदार कंगना राणावत आणि सपा नेते राम गोपाल यादव यांच्यासह अनेक नेत्यांनी मतदान केले. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही निवडणुकीत मतदान केले.दरम्यान, यामध्ये भारत राष्ट्र समिती (४ राज्यसभा खासदार), बिजू जनता दल (७ राज्यसभा खासदार) आणि शिरोमणी अकाली दल (१ लोकसभा आणि २ राज्यसभा खासदार) यांनी मतदानात भाग घेतला नाही. २१ जुलै रोजी माजी उपाध्यक्ष जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यामुळे ही निवडणूक घेण्यात आली.या निवडणुकीत संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य मतदान करण्यास पात्र होते. इलेक्टोरल कॉलेजमध्ये एकूण ७८८ सदस्य आहेत. त्यापैकी २४५ राज्यसभेचे आणि ५४३ लोकसभेचे आहेत. सध्या या सदस्यांची एकूण संख्या ७८१ आहे, कारण राज्यसभेत ६ आणि लोकसभेत १ जागा रिक्त आहे. अशा परिस्थितीत निवडणूक जिंकण्यासाठी ३९१ मतांची आवश्यकता होती.राज्यसभेचे सरचिटणीस पी.सी. मोदी यांनी दिलेल्या माहितीनुसार सी. पी. राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची ४५२ मते मिळाली. तर विरोधी इंडिया आघाडीचे उमेदवार माजी न्यायमूर्ती सुदर्शन रेड्डी यांना पहिल्या पसंतीची ३०० मते मिळाली.या विजयासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सी.पी. राधाकृष्णन यांचे अभिनंदन केले. ते एक्सवर म्हणाले, “भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवडून आल्याबद्दल सी.पी. राधाकृष्णन यांचे अभिनंदन. तळागाळातून वर आलेले नेते म्हणून तुमची विवेकबुद्धी आणि प्रशासनाबद्दलचे सखोल ज्ञान आपल्याला आपल्या संसदीय लोकशाहीतील सर्वोत्तम गोष्टी करण्यासाठी मदत करेल असा माझा ठाम विश्वास आहे. वरिष्ठ सभागृहाच्या पावित्र्याचे रक्षक म्हणून तुमच्या प्रवासासाठी मी तुम्हाला हार्दिक शुभेच्छा देतो.”जता मतदान सुरू झाले आणि सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालले. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम मतदान केले. त्यानंतर केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अर्जुन राम मेघवाल आणि किरेन रिजिजू, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, भाजपा खासदार कंगना राणावत आणि सपा नेते राम गोपाल यादव यांच्यासह अनेक नेत्यांनी मतदान केले. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही निवडणुकीत मतदान केले.दरम्यान, यामध्ये भारत राष्ट्र समिती (४ राज्यसभा खासदार), बिजू जनता दल (७ राज्यसभा खासदार) आणि शिरोमणी अकाली दल (१ लोकसभा आणि २ राज्यसभा खासदार) यांनी मतदानात भाग घेतला नाही. २१ जुलै रोजी माजी उपाध्यक्ष जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यामुळे ही निवडणूक घेण्यात आली.या निवडणुकीत संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य मतदान करण्यास पात्र होते. इलेक्टोरल कॉलेजमध्ये एकूण ७८८ सदस्य आहेत. त्यापैकी २४५ राज्यसभेचे आणि ५४३ लोकसभेचे आहेत. सध्या या सदस्यांची एकूण संख्या ७८१ आहे, कारण राज्यसभेत ६ आणि लोकसभेत १ जागा रिक्त आहे. ३९१ मतांची आवश्यकता होती. राज्यसभेचे सरचिटणीस पी.सी. मोदी यांनी दिलेल्या माहितीनुसार सी.पी. राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची ४५२ मते मिळाली.

### एकूण ९८ टक्के मतदान झाले

न्यायमूर्ती सुदर्शन रेड्डी यांना पहिल्या पसंतीची ३०० मते मिळाली.या विजयासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सी.पी. राधाकृष्णन यांचे अभिनंदन केले. ते एक्सवर म्हणाले, “भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवडून आल्याबद्दल सी.पी. राधाकृष्णन यांचे अभिनंदन. तळागाळातून वर आलेले नेते म्हणून तुमची विवेकबुद्धी आणि प्रशासनाबद्दलचे सखोल ज्ञान आपल्याला आपल्या संसदीय लोकशाहीतील सर्वोत्तम गोष्टी करण्यासाठी मदत करेल.

# नेपाळच्या अर्थमंत्र्यांवर हल्ला

## तरुण आंदोलकांनी पाठलाग करत लाथाबुक्क्यांनी केली मारहाण

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नेपाळमध्ये सुरू असलेल्या हिंसक आंदोलनादरम्यान, एक व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये अर्थमंत्री बिष्णू प्रसाद पौडेल यांच्यावर जेन झेड आंदोलक हल्ला करताना दिसत आहेत. यावेळी आंदोलकांनी पौडेल यांचा रस्त्यावर पाठलाग करत त्यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.**



व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये काठमांडूच्या रस्त्यांवर अनेक लोक पौडेल यांच्या मागे धावत असल्याचे दिसून येते आणि यादरम्यान एक आंदोलक त्यांना ढकलतो यानंतर ते भिंतीवर आदळल्याचे दिसत आहे. यानंतर पौडेल यांनी उठून जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा आंदोलनकांनी पुन्हा त्यांचा पाठलाग सुरू केला.नेपाळ आणि राजधानी काठमांडूसह इतर अनेक शहरांमध्ये हजारो आंदोलक सुरक्षा दलांशी संघर्ष करत आहेत. संपूर्ण देशभरात हिंसक संघर्ष सुरू आहेत. परिस्थिती बिकट होत असताना नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी राजीनामा दिला आहे. दरम्यान जेन झेड तरुणांनी सुरू केलेल्या आंदोलनात आतापर्यंत २० जणांचा मृत्यू झाला आहे आणि २५० हून अधिक जण जखमी झाले आहेत.

दरम्यान आंदोलक सरकारविरुद्ध इतके संतप्त आहेत की, त्यांनी अनेक केंद्रीय मंत्र्यांच्या घरांना आग लावली आहे. आंदोकांनी संसद आणि राष्ट्रपती भवनातही घुसून तेथे आग लावली.

हिंसक आंदोलन नियंत्रित करण्यात पोलीस आणि सुरक्षा संस्था अपयशी ठरत आहेत. दिल्लीहून काठमांडूला जाणारी आपली उड्डाणे रद्द केली आहेत.

### भारताला झाले खूप दुःख

आहे आणि काठमांडूमधील त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळ तात्पुरते बंद करण्यात आले आहे. एअर इंडिया व्यतिरिक्त, इंडिगोनेही सुरक्षेच्या कारणास्तव काठमांडूला जाणारी उड्डाणे रद्द केली आहेत.भारत शेजारील नेपाळमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी सांगितले की, नेपाळमध्ये आंदोलनात अनेक तरुणांच्या मृत्यूमुळे भारताला खूप दुःख झाले आहे.

# कुंद्राच्या एक्स पत्नीने केला शिल्पावर गंभीर आरोप



बॉलिवूडमधील पॉवरफूल कपल म्हणून अभिनेत्री शिल्पा शेट्टी (SHILPA SHETTY) आणि राज कुंद्रा (RAJ KUNDRA) यांच्याकडे पाहिलं जातं. कितीही अडीअडचणी आल्या तरी सुद्धा ही जोडी एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभी रहात असल्याचं दिसून येतं. राजचं हे दुसरं लग्न असून शिल्पा पूर्वी त्याने कवितासोबत लग्न केलं होतं. मात्र, कविताला घटस्फोट देत त्याने शिल्पासोबत दुसरा संसार थाटला. परंतु, या लग्नामुळे कविता नाराज झाली होती. इतकंच नाही तर तिने शिल्पावर तिच्या संसार मोडल्याचा आरोपही केला होता.शिल्पा आणि राज या जोडीने २००९ मध्ये लग्नगाठ बांधली. या लग्नानंतर कविताने राज आणि शिल्पावर अनेक गंभीर आरोप केले होते. कविताने डेली मेलला एक मुलाखत दिली होती. या मुलाखतीमध्ये तिने शिल्पावर टीकास्त्र डागलं होतं. जेव्हा मी राजबरोबर गप्पा मारायचे त्यावेळी तो कायम शिल्पाबद्दलच बोलायचा. त्यामुळे त्याला माझ्यापेक्षा नक्कीच कोणीतरी चांगली व्यक्ती भेटलीये हे कळलं होतं", असं कविताने मुलाखतीमध्ये म्हटलं होतं. सोबतच 'शिल्पामुळे माझा संसार मोडला', असंही ती म्हणाली होती. कविताच्या या वक्तव्यावर शिल्पानेही तिच्याच शब्दांत उत्तर दिलं. शिल्पाने 'हॅलो मॅगझी'नला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत तिने कविताने केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया दिली आहे. "मी राजला स्पष्टपणे ताकीद दिली होती की जोपर्यंत तो घटस्फोट घेत नाही तोपर्यंत मी त्याच्याशी लग्न करणार नाही. आपल्यात फक्त मैत्री राहील. मी कधीच कोणाचं घर, संसार मोडला नाही. माझ्यासाठी हे शब्द वापरणं खूप चुकीचं आहे. या सगळ्या गोष्टीचा माझ्या आई-वडिलांना त्रास झाला होता.

## सोनारीकावर गुन्हा दाखल !

काही दिवसांपुर्वी बालकलाकार साईशा भोईरची आई पूजा भोईला आर्थिक फसवणुक केली म्हणुन अटक करण्यात आली. आता आणखी एका अभिनेत्रीने एका व्यक्तीची फसवणुक केल्याचा आरोप करण्यात आलाय. ही अभिनेत्री म्हणजे सोनारीका भदोरिया. सोनारीका भदोरिया हिने देवो के देव या लोकप्रिय टीव्ही मालिकेत अभिनय केलाय. सोनारीकाविरुद्ध आर्थिक फसवणुक झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलाय. सोनारिका भदोरिया ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री. सोनारिकाने आजवर अनेक हिंदी मालिकांमध्ये लोकप्रिय भुमिका साकारल्या आहेत. सोनारिका विरोधात माहिम येथील शाहू नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलीय. सोनारिका तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक जाहिरात ठेवली होती. त्या जाहीरातीत पैशांची गुंतवणुक करुन खुप पैसे कमवा, असं सांगण्यात आलं होतं ही जाहीरात पाहून परमेश मैत्री नामक व्यक्तिने पैशांची गुंतवणुक केली. परंतु नंतर आपली फसवणुक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. म्हणुन त्याने पोलिस ठाण्यात अभिनेत्रीविरोधात तक्रार करुन गुन्हा

## घटनेचं कव्हरेज करणं टाळावं



अभिनेता सैफ अली खानवर गुरुवारी ( १६ जानेवारी ) रात्री वांद्रे येथील राहत्या घरात दरोडेखोराने चाकूने हल्ला केला. ही बातमी समोर येताच संपूर्ण बॉलीवूड विश्वात खळबळ उडाली. मध्यरात्री सैफला त्याचा मुलगा इब्राहिम अली खान आणि केअरटेकरने लीलावती रुग्णालयात दाखल केलं. सैफला रुग्णालयात दाखल केल्यावर डॉक्टरांनी तातडीने उपचारांना सुरुवात केली. यानंतर अभिनेत्यावर मोठी शस्त्रक्रिया पार पडली. यादरम्यान, सैफचे चाहते व कुटुंबीय प्रचंड चिंतेत होते. गुरुवारी दुपारी, सैफच्या टीमकडून तसेच लीलावती रुग्णालयातील डॉक्टरांनी अभिनेत्याच्या प्रकृतीबाबत अपडेट दिली. सैफवर शस्त्रक्रिया पूर्ण झाली असून, पुढील काही दिवस डॉक्टरांची टीम त्याच्या प्रकृतीकडे लक्ष ठेवेल आणि याप्रकरणी पोलीस पुढचा तपास करतील असं अभिनेत्याच्या टीमने सांगितलं. सबा पतौडी व्यतिरिक्त या घटनेबाबत कोणीही सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली नव्हती. आता नुकतीच करीना कपूर खानने या घटनेबाबत आपली पहिली प्रतिक्रिया इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत दिली आहे.करीना लिहिते, "हा आम्हा कुटुंबीयांसाठी प्रचंड आव्हानात्मक दिवस होता. गेल्या काही तासांमध्ये नेमकं काय घडलंय...या सगळ्याचा विचार आम्ही अजूनही करत आहोत. आमचं कुटुंब या कठीण काळातून जात असताना, मी मीडिया आणि पापाराझींना आदरपूर्वक आणि नम्रपणे विनंती करते की, त्यांनी सतत अनुमान काढणं आणि या घटनेचं कव्हरेज करणं टाळावं. या काळात तुम्ही दाखवलेल्या प्रेमाबद्दल आणि तुम्ही सर्वांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल मी निश्चितच आभारी आहे. एक कुटुंब म्हणून या घटनेतून बाहेर पडण्यासाठी आम्हाला काही वेळ द्या. या संवेदनशील काळात तुम्ही केलेल्या सहकार्याबद्दल मी तुमचे आभार मानू इच्छिते"दरम्यान, करीना कपूरने ही पोस्ट शेअर केल्यावर अनेक बॉलीवूड कलाकारांनी अभिनेत्रीला पाठिंबा देत,असं कमेंट सेक्शनमध्ये म्हटलं आहे. याशिवाय पूजा भट्ट, रवीना टंडन या अभिनेत्रींनी देखील सैफसाठी पोस्ट शेअर करत कलाकारांच्या सुरक्षेवर प्रश्न उपस्थित केले आहेत.

## दरोडेखोराने 1 कोटी रुपये मागितले

अभिनेता सैफ अली खान व करीना कपूर खान यांच्या मुंबईतील घरी धक्कादायक घटना घडली. गुरुवारी मध्यरात्री एक दरोडेखोर त्यांच्या घरात शिरला. या दरोडेखोराने हल्ला केल्यामुळे सैफ अली खान व घरातील एक मदतनीस जखमी झाले. या दरोडेखोराचा फोटो पोलिसांनी प्रसिद्ध केला आहे. या दरोडेखोराबद्दल मोठी माहिती समोर आली आहे. अभिनेता सैफ अली खानच्या वांद्रे येथील घरी गुरुवारी एक दरोडेखोर शिरला. त्याने घरातील मदतनीसला धमकी देऊन एक कोटी रुपयांची मागणी केली. हा गोंधळ ऐकून सैफ अली खान खोलीत धावला आणि हल्लेखोराशी झालेल्या झटापटीत तो जखमी झाला, अशी माहिती समोर आली आहे. मुंबईतील एका आलिशान इमारतीच्या १२ व्या मजल्यावरील सैफच्या अपार्टमेंटमध्ये रात्री उशिरा ही घटना घडली.पोलिसांनी नोंदवलेल्या जबाबानुसार, सैफ अली खानच्या घरातील मदतनीस महिलेला बाथरूमजवळ एक सावली दिसली. सुरुवातीला तिला वाटलं की करीना कपूर तिच्या धाकट्या मुलाला बघायला आली आहे, पण नंतर तिला संशय आला आणि ती चौकशीसाठी जवळ गेली.

## मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले : अंकिता लोखंडे



अभिनेत्री अंकिता लोखंडेने अलीकडेच तिच्या गर्भधारणेच्या अफवांवर चर्चा केली. तिने अशा बातम्या चुकीच्या असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडियावर बेबी बंपसोबत व्हायरल होत असलेल्या फोटोंवर अंकिताने प्रतिक्रियाही दिली. याशिवाय अभिनेत्रीने तिच्या बाळाच्या नियोजनाबाबतही चर्चा केली. खरंतर, लग्नानंतर अनेकवेळा अंकिता प्रेग्नंट असल्याच्या बातम्या येत आहेत. मात्र, या सर्व केवळ अफवा असल्याचे सिद्ध झाले आहे. अंकिताला तिच्या गरोदरपणाच्या अफवांवर विचारण्यात आले. यावर ती म्हणाली- मी काही पहिली सेलिब्रिटी नाही जी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अशा निराधार बातम्या ऐकत राहते. प्रत्येक सेलिब्रिटीसोबत असे घडते. ती पुढे म्हणाली- 'सर्व प्रथम, जेव्हा तुम्ही सिंगल नसता तेव्हा तुम्ही लग्न कधी करणार असा प्रश्न सतत विचारला जातो. लग्न झाले आहे, किंवा होणार आहे, अशी अटकळ बांधली जात आहे. यानंतर, जेव्हा तुमचे लग्न होते, तेव्हा बातम्या येतात की तुम्ही गर्भवती आहात किंवा तुम्हाला मुले होत नाहीत. तुमच्याबद्दल या गोष्टी सतत विचारल्या जातात आणि लिहिल्या जातात. कधी-कधी ते घटस्फोटाबाबतही बोलू लागतात, मला वाटतं हे सगळं मीडियात घडत राहतं. संवादादरम्यान अंकिताला विचारण्यात आले की अशा बातम्यांचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होतो का? यावर ती म्हणाली- 'मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले आहेत. तिचे मॉर्फ केलेले फोटो फेक बेबी बंप दाखवतानाही पाहिले आहेत. खरे सांगायचे तर या गोष्टींचा माझ्या आयुष्यावर काहीही परिणाम होत नाही. मी त्यांच्याकडे लक्ष देत नाही, उलट अशा गोष्टी पाहून हसते.

आशिया चषक २०२५ अफगाण संघासमोर १०० धावाही करू शकला नाही नवा संघ

# अफगाणिस्तानची विजयी सलामी!

## हाँगकाँगवर ९४ धावांनी मोठा विजय

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अफगाणिस्तानच्या संघाने हाँगकाँगवरील विजयासह आशिया चषक २०२५ मधील आपलं खातं उघडलं आहे. अफगाणिस्तानच्या गोलंदाजांसमोर हाँगकाँगचा संघ फार काळ टिकू शकला नाही आणि अफगाणिस्ताननेे ९४ धावांनी मोठा विजय मिळवला आहे. हा मोठा विजय गुणतालिकेत अफगाणिस्तानसाठी महत्त्वाचा ठरला.**



प्रथमच आशिया चषक खेळत असलेला हाँगकाँग संघाने अफगाणिस्तानसमोर गुडघे टेकले. गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली असली तरी हाँगकाँगचे फलंदाज मात्र फेल ठरले. संघाच्या दोनच फलंदाजांनी दुहेरी आकडा गाठला. त्यापैकी ९ फलंदाज एकेरी धावांवर बाद झाले.रशीद खानने सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अफगाणिस्तानची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. रहमानुल्ला गुरबाज आणि इब्राहिम झादरान हे विस्फोटक फलंदाज स्वस्तात माघारी परतले. यानंतर सदिकउल्लाह अटलने मोहम्मद नबीसह भागीदारी रचत संघाचा डाव पुढे नेला. अटलने ५२ चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ७३ धावांची खेळी केली. तर नबीने २६ चेंडूत ३चौकार आणि एका षटकारासह ३३ धावांची खेळी केली. अझमतुल्लाह उमरझाईने वादळी खेळी खेळत फक्त २० चेंडूत अर्धशतक झळकावलं आणि ५३ धावा केल्या. त्याने २५२.३८ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना २ चौकार आणि ५ षटकार मारले. हाँगकाँगकडून किंचित शाह सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने ३ षटकांत २४ धावा देत २ बळी घेतले. आयुष शुक्लानेही २ बळी घेतले. पण त्याने ४ षटकांत ५४ धावा दिल्या. याशिवाय अतिक इक्बाल आणि एहसान खान यांनीही प्रत्येकी १ बळी घेतला.१८८ धावांचा डोंगर उभारल्यानंतर अफगाणिस्तानच्या गोलंदाजीतही चमकदार कामगिरी केली. त्यांनी पॉवरप्लेमध्येच हाँगकाँगच्या ४ फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवलं. त्यानंतर हाँगकाँग संघ या सामन्यात पुनरागमन करू शकला नाही. हाँगकाँगचा निम्मा संघ फक्त ४३ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला आणि २० षटकांत १०० धावाही करू शकला नाही.हाँगकाँगने २० षटकांत ९ गडी गमावून ९४ धावा केल्या. बाबर हयातने सर्वाधिक ३९ धावा केल्या, त्याच्याशिवाय इतर कोणताही खेळाडू २० धावांचा टप्पा गाठू शकला नाही. अफगाणिस्तानकडून गुलबदिन नायब आणि फजलहक फारुकी यांनी २-२ बळी घेतले. अझमतुल्ला उमरझाई, रशीद खान आणि नूर अहमद यांनीही १-१ बळी घेतला.प्रथमच आशिया चषक खेळत असलेला हाँगकाँग संघाने अफगाणिस्तानसमोर गुडघे टेकले. गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली असली तरी हाँगकाँगचे फलंदाज मात्र फेल ठरले. संघाच्या दोनच फलंदाजांनी दुहेरी आकडा गाठला. त्यापैकी ९ फलंदाज एकेरी धावांवर बाद झाले.रशीद खानने सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अफगाणिस्तानची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. रहमानुल्ला गुरबाज आणि इब्राहिम झादरान हे विस्फोटक फलंदाज स्वस्तात माघारी परतले. यानंतर सदिकउल्लाह अटलने मोहम्मद नबीसह भागीदारी रचत संघाचा डाव पुढे नेला. अटलने ५२ चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ७३ धावांची खेळी केली. तर नबीने २६ चेंडूत ३चौकार आणि एका षटकारासह ३३ धावांची खेळी केली. अझमतुल्लाह उमरझाईने वादळी खेळी खेळत फक्त २० चेंडूत अर्धशतक झळकावलं आणि ५३ धावा केल्या. त्याने २५२.३८ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना २ चौकार आणि ५ षटकार मारले. हाँगकाँगकडून किंचित शाह सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने ३ षटकांत २४ धावा देत २ बळी घेतले. आयुष शुक्लानेही २ बळी घेतले. पण त्याने ४ षटकांत ५४ धावा दिल्या. याशिवाय अतिक इक्बाल आणि एहसान खान यांनीही प्रत्येकी १ बळी घेतला.

### १०० धावाही करू शकला नाही

१८८ धावांचा डोंगर उभारल्यानंतर अफगाणिस्तानच्या गोलंदाजीतही चमकदार कामगिरी केली. त्यांनी पॉवरप्लेमध्येच हाँगकाँगच्या ४ फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवलं. त्यानंतर हाँगकाँग संघ या सामन्यात पुनरागमन करू शकला नाही. हाँगकाँगचा निम्मा संघ फक्त ४३ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला आणि २० षटकांत १०० धावाही करू शकला नाही.

# डेवाल्ड ब्रेविससाठी रेकॉर्डब्रेक बोली!

## गांगुलीने सुपर किंग्सच्या स्वप्नांवर फेरलं पाणी

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बेबी एबी म्हणून आपली ओळख तयार करणारा डेवाल्ड ब्रेविसने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. डेवाल्ड ब्रेव्हिस हा दक्षिण आफ्रिकेच्या टी२० लीग SA20 मध्ये सर्वात महागडा खेळाडू ठरला. ९ सप्टेंबर रोजी झालेल्या SA20 2026 च्या लिलावात, प्रिटोरिया कॅपिटल्सने त्याच्यावर विक्रमी बोली लावत संघात सामील केलं. कॅपिटल्स संघाकडून लिलावासाठी उपस्थित असलेल्या सौरव गांगुलीने सुपर किंग्स संघाला मोठा धक्का दिला.**



जोहान्सबर्गमधील लिलावादरम्यान, २२ वर्षीय डेवाल्ड ब्रेव्हिसला सर्वाधिक मागणी होती. ब्रेव्हिसने अलीकडेच आयपीएल आणि ऑस्ट्रेलियाविरूद्ध चमकदार कामगिरी केली होती, ज्यामुळे सर्व फ्रँचायझींनी त्याच्यावर मोठी बोली लावली. प्रिटोरिया कॅपिटल्स संघाने त्याला खरेदी करण्यासाठी सर्वाधिक बोली लावली आणि डेवाल्ड ब्रेव्हिस या लीगच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला. एडेन मारक्रमवर देखील मोठी बोली लागली.दक्षिण आफ्रिकेचा स्टार फलंदाज डेवाल्ड ब्रेव्हिससाठी SA20 लिलावात फ्रँचायझींमध्ये जोरदार लढत झाली. प्रिटोरिया कॅपिटल्स संघ बोली जिंकण्यात यशस्वी झाला. प्रिटोरिया कॅपिटल्सने डेवाल्ड ब्रेव्हिससाठी १६ मिलियन रँड (८.०६ कोटी रुपये) खर्च केले. यासह, तो SA20 लीगच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू बनला.सुपर किंग्जने लिलावात आक्रमक सुरुवात केली आणि लवकरच बोलीची किंमत ३० लाख रँड ओलांडली. मुंबई इंडियन्स केपटाऊन आणि पार्ल रॉयल्सनेही बोली लावण्यात भाग घेतला, परंतु नंतर त्यांनी माघार घेतली. शेवटी कॅपिटल्सने बाजी मारली आणि ब्रेविसला संघात सामील केलं.

### लिलावात उतरण्याचा निर्णय

दक्षिण आफ्रिकेचा स्टार फलंदाज आणि टी-२० कर्णधार एडेन मारक्रमनेही SA20 २०२६ च्या लिलावात इतिहास घडवला. डर्बन सुपर जायंट्सने त्याला ७ कोटी रुपयांच्या विक्रमी रकमेत विकत घेतले, जी SA20 मधील आतापर्यंतची दुसरी सर्वात मोठी बोली आहे. सनरायझर्स ईस्टर्न केपसाठी यापूर्वी दोनदा SA20 विजेतेपद जिंकलेल्या मारक्रमने लिलावात उतरण्याचा निर्णय घेतला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

epaper.mahaenews.com

# महाईन्यूज ™

ePaper

। बुधवार ।
। दि. 10 सप्टेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### अवघड आणि अती क्लिष्ट विषयाचे सहज, सुलभ विश्लेषण करणे शक्य

# 'एआय'मुळे अध्यापन अधिक परिणामकारक - डॉ. अमेय पांगारकर

## शिक्षण विश्व : एसबीपीआयएम मध्ये "एआय फॉर टीचर्स" प्रशिक्षण कार्यशाळा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'एआय'चा उपयोग करून अवघड आणि अती क्लिष्ट विषयाचे सहज, सुलभ विश्लेषण करणे शक्य आहे. विविध प्रकारचे टूल वापरून अभियांत्रिकीशिवाय इतर अभ्यासक्रमातही शिक्षकांनी याचा वापर केला पाहिजे. पुढील काळात एआय मुळे अध्यापन अधिक परिणामकारक होईल असे मत 'ए कन्सल्टन्सी'चे सहसंस्थापक डॉ. अमेय पांगारकर यांनी केले.केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचलित एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या कर्मचारी विकास समितीच्या वतीने "एआय फॉर टीचर्स" या विषयावर प्राध्यापकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. किर्ती धारवडकर, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. योगेंद्र देवकर, डॉ. काजल महेश्वरी, डॉ. अमरीश पद्मा, डॉ. हीना आदींसह एमबीए चे सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

अध्यापन पद्धती अधिक परिणामकारक व आकर्षक करण्यासाठी एआयचा वापर कसा करता येईल, याचे व्यवहार्य मार्गदर्शन शिक्षकांना मिळाले पाहिजे. यासाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यामुळे प्राध्यापकांना शैक्षणिक कार्यात नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची प्रेरणा मिळेल. अध्यापन प्रक्रियेत अधिक गुणवत्ता व नाविन्य आणण्यास हा कार्यक्रम उपयुक्त ठरेल असे एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. किर्ती धारवडकर यांनी सांगितले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

---

# संत साई विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

## शिक्षण विश्व: महान शिक्षकांचे स्मरण करून कृतज्ञता व्यक्त

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**संत साई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिक्षक दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. माजी राष्ट्रपती आणि आदर्श शिक्षक डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.**



संस्थापक अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर, संचालिका सुनीता ढवळेश्वर व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी ढवळेश्वर यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्यासह सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांसारख्या महान शिक्षकांचे स्मरण करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. "जो आयुष्यभर शिकतो आणि विद्यार्थ्यांकडून शिकण्यास मागेपुढे पाहत नाही, तोच खरा शिक्षक असतो," असे विचार त्यांनी मांडले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांनी सर्वांच्या प्रती कृतज्ञ राहावे, असा मौल्यवान संदेश दिला.

संस्थेच्या विश्वस्त पायल ढवळेश्वर यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी श्रद्धा, विश्वास आणि कृतज्ञतेची भावना बाळगावी, असे मत व्यक्त केले. "काळ्या फळ्यावर पांढऱ्या खडूने अक्षरे उमटवत शिक्षक हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात रंग भरतात," या शब्दांत त्यांनी शिक्षकांचे योगदान गौरवले. शिक्षिका मंजुषा वाळवेकर यांनी आभार प्रदर्शन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. संपूर्ण वातावरण शिक्षण, संस्कार आणि कृतज्ञतेच्या भावनेने भरले होते.

## मोशी प्राधिकरण येथे आरटीओच्या बाजूला

# 'सिल्वराईज ग्रँड स्काय' प्रकल्पाचे भूमिपूजन

### आमदार महेशदादा लांडगे यांच्या हस्ते सोहळा संपन्न



। मोशी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोशी प्राधिकरण (सेक्टर क्र. ६) पाण्याच्या टाकी शेजारी व नवीन आरटीओच्या बाजूला सिल्वराईज ग्रुपतर्फे उभारण्यात येणाऱ्या "सिल्वराईज ग्रँड स्काय" या भव्य गृहप्रकल्पाचे भूमिपूजन आमदार महेशदादा लांडगे यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.**

**मान्यवरांची उपस्थिती, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग**

या प्रसंगी उद्योजक संतोष बारणे, प्रताप बारणे यांच्यासह सिल्वराईज कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, मान्यवर, स्थानिक नागरिक व ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूमिपूजन सोहळ्यात सर्व सहकाऱ्यांचा, मित्रपरिवाराचा व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

**गुणवत्ता आणि विश्वास यांची परंपरा कायम**

सिल्वराईज ग्रुपने आतापर्यंत बांधकाम क्षेत्रात प्रामाणिकपणा, दर्जेदार काम, वेळेचे काटेकोर नियोजन आणि ग्राहकांचा विश्वास या अधिष्ठानावर भक्कम पाया निर्माण केला आहे. ग्राहकांच्या स्वप्नातील घर वेळेत व गुणवत्तेसह पूर्ण करून देण्याचा विश्वास जपत हा समूह सातत्याने पुढे जात आहे.

**"ग्रँड स्काय" प्रकल्प ्राहकांच्या स्वप्नांना नवी उंची**

याच परंपरेतून उभारण्यात येणारा "सिल्वराईज ग्रँड स्काय" हा भव्य कमर्शियल व रेसिडेन्शियल प्रकल्प पिंपरी-चिंचवड तसेच पुणे जिल्ह्यातील ग्राहकांना नवी उंची देणार आहे. सातत्यपूर्ण गुणवत्तेमुळे ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे सिल्वराईज ग्रुपने यावेळी सांगितले.

---

## जिल्हा डॉजबॉल स्पर्धेत एच.ए. स्कूलचा डंका

### दोन विजेतेपदावर नाव कोरलं; पिंपरीत जिल्हा डॉजबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा डॉजबॉल स्पर्धा नुकतीच एच. ए. स्कूल पिंपरी येथे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे व उपायुक्त पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात पार पडल्या.**

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी शाळेच्या उपमुख्याध्यापिका सुजाता कोरके, आशा माने तसेच क्रीडाधिकारी रंगराव कारंडे यांनी उपस्थित राहून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे प्रास्ताविक क्रीडा समन्वयक कन्हेरे यांनी केले, तर क्रीडाशिक्षक मुकेश पवार, हनुमंत सुतार व शिवाजी मुटकुळे यांनी संपूर्ण कामकाज पाहिले. पंच म्हणून पिंपरी चिंचवड डॉजबॉल संघटना व पुणे जिल्हा डॉजबॉल संघटनेचे सचिव रामेश्वर हराळे व त्यांच्या टीमने काम पाहिले. स्पर्धेत खेळाडूंनी दमदार खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली.

**स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे..**

१७ वर्षे मुले गटात एच. ए. स्कूल, पिंपरी (गुण १०) यांनी शिक्षण प्रसारक मंडळी मराठी माध्यम, निगडी (गुण ४) यांचा पराभव करून प्रथम क्रमांक पटकावला. तृतीय स्थानावर सावित्रीबाई फुले शाळा, मोशी (गुण ५) तर चौथ्या स्थानावर एम. एम. विद्यामंदिर, काळेवाडी (गुण ३) राहिले.

१७ वर्षे मुली गटात एच. ए. स्कूल, पिंपरी (गुण १६) यांनी विद्यानंद भवन स्कूल, निगडी (गुण ०) यांचा पराभव करून विजेतेपद मिळवले. तृतीय स्थान सेंट पीटर स्कूल (गुण ५) यांनी मिळवले तर पीसीएमसी पिंपळे गुरव विद्यालय (गुण २) चौथ्या स्थानावर राहिले.

१९ वर्षे मुली गटात शिक्षण प्रसारक मंडळी मराठी माध्यम, निगडी (गुण ६) यांनी एच. ए. स्कूल, पिंपरी (गुण २) यांचा पराभव करून प्रथम क्रमांक पटकावला. तृतीय स्थान एम. एम. विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळेवाडी (गुण ९) यांनी मिळवले तर सेंट उर्सुला हायस्कूल, निगडी (गुण १) चौथ्या स्थानावर राहिले.

या स्पर्धेत एच. ए. स्कूल, पिंपरीने उत्कृष्ट कामगिरी करत एकूण दोन विजेतेपद पटकावून आपला डंका वाजवला. स्पर्धेतील सर्व विजेत्या संघांचे विशेष अभिनंदन करण्यात आले असून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025-26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046